F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ : रजिस्टर एडी / ईमेल द्वारे**

क्र.:१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२०-२१/ ३३०
दि. - १४ / १० /२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्व नवी दिल्ली यांची प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ च्या अंमलबजावणी बाबत...**

उपरोक्त विषया संबंधी कळविण्यात येते कि, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्व नवी दिल्ली यांची प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजनांची महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलबजावणी साठी **तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणुन घोषित करण्यात आले आहे. सदर दोन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे.

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना -

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्वेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थिनीं** साठी प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे

- **नविन संच/कोटा (Quota)**

| राज्य | अ क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- शिष्यवृत्ती रक्कम

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना -

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष सक्षम विद्यार्थ्यासाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखा पर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे.

- **नविन संच/कोटा ( Quota )**

| राज्य | अ क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ www.aicte-india.org वर देण्यात आलेली आहे.

सदर योजनांची मंजुर रक्कम Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarships Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सन २०२०-२१ च्या सदर योजनेच्या लाभासाठी **प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येत की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपरोक्त योजनांबाबत सुचित करण्यात यावे ( तसेच संस्थांनाही विद्यार्थ्यांना सुचना देण्याबाबत कळविण्यात यावे ).

संस्थांनी NSP Portal च्या लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून प्राप्त झालेल्या अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन-रित्या तपासणी ( मंजूर/नामंजूर ) करावी.

➢ **खालील अति महत्त्वाची सूचना देखील संस्थांना देण्यात यावी .**

१. तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या **ज्या संस्थांनी आज तारखेपर्यंत NSP पोर्टलचा** लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन, संस्था रजिस्ट्रेशन अर्ज (Institute KYC) भरुन मंजूरी घेतलेली नाही अशा सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, अशा संस्थांनी केंद्र शासनाच्या NSP पोर्टल ( www.scholarships.gov.in ) वर संस्थेकडे असलेला पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेल्या Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Fill Registration Form" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Registration Form काळजीपूर्वकरित्या संपूर्ण भरुन त्याची साक्षांकीत प्रत ( Printout with duly signed ) संस्थेच्या पत्राद्वारे ***संचालक, तंत्रशिक्षण***

***संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१*** यांचेकडे टपालाने किंवा त्याची scan copy "**desk18@dtemaharashtra.gov.in**" या ईमेल आयडीवर १० दिवसांच्या आत मंजूरीसाठी पाठवून मंजूर करुन घ्यावा. संस्थेकडून Registration Form मध्ये भरलेल्या माहितीला मंजूरी मिळाल्यानंतर संस्थांच्या नोडल ऑफीसरच्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन प्रणालीद्वारे संस्थेला नवीन पासवर्ड प्राप्त होणार आहे. त्या प्राप्त पासवर्डचा वापर करुन संस्थांनी Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Update Profile" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Institute Profile अद्ययावत करुन घ्यावी. **अन्यथा या कारणास्तव संस्थेत शिकणारा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

२. ज्या संस्था National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर नोंदणीकृत झालेल्या नाहीत ( यादी पोर्टलवर उपलब्ध ) किंवा संस्था पूर्वीचा लॉगीन आयडी व पासवर्ड विसरली असेल अशा व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील संस्थांनी पत्राद्वारे खालील प्रपत्रातील माहिती AISHE Code Certificate सह ***संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१*** यांचेकडे टपालाने किंवा त्याची scan copy "**desk18@dtemaharashtra.gov.in**" या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावी जेणेकरुन ऑनलाईन सिस्टिमद्वारे Login_Id व Password प्रपत्रामध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवर पाठविता येईल व संस्थांना त्याचा वापर करुन वरील दिलेल्या पध्दतीने Registration Form भरुन मंजूरीसाठी जमा करता येईल.

<table>
<tr><td colspan="8">Information of Institute for receiving the Login Id and Password of National Scholarship Portal</td></tr>
<tr><td rowspan="2">AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX)</td><td rowspan="2">Previous Registered Code on NSP Portal / Login Id of Portal ( If Institute have ) otherwise mention " NA"</td><td rowspan="2">Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code</td><td rowspan="2">DTE Code ( Only for that Inst. which comes under DTE)</td><td rowspan="2">Institute Address</td><td rowspan="2">Institute District</td><td colspan="2">Details ( on which Login_id and Password will be required )</td></tr>
<tr><td>Name</td><td>Mobile No.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.यांना माहितीसाठी सविनय सादर.